# बृहन्मुंबई महानगरपालिका
## कामगार विभाग

दिनांक: ११.१२.२०१७

**<u>महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारित करावयाच्या जाहिरातीचा मसुदा</u>**

कामगार/कक्ष परिचर/श्रमिक/हमाल/बहुउद्देशीय कामगार/आया/स्मशान कामगार इ. पदाची सरळसेवा भरती

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खाते/विभाग/रुग्णालये यांच्या आस्थापनेवरील कामगार/कक्ष परिचर/श्रमिक/हमाल/बहुउद्देशीय कामगार/आया या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्यासाठी निवडयादी तयार करण्यासाठी उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पदभरतीकरीता पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

**१. कामगार/कक्ष परिचर/श्रमिक/हमाल/बहुउद्देशीय कामगार/आया/स्मशान कामगार इ. रिक्त पदांची माहिती:**

**<u>एकूण पदे - १३८८</u>**

| | | रिक्त पदांची प्रवर्गनिहाय संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदाचे नाव** | **एकूण रिक्त पदे** | **खुला** | **अजा** | **अज** | **विजाअ** | **भजब** | **भजक** | **भजड** | **विमाप्र** | **इमाव** |
| कामगार/ कक्षपरिचर/ श्रमिक/ हमाल/बहुउद्देशीय कामगार/ आया/इ. | **1388** | 504 | 223 | 108 | 48 | 34 | 51 | 32 | 32 | 356 |

| **तपशील** | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | **एकूण मागास** | खुला | **एकूण पदे** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण सामाजिक आरक्षणांतर्गत भरावयाची पदे | 75 | 37 | 17 | 11 | 16 | 10 | 10 | 117 | **293** | 166 | 459 |
| 30% महिला आरक्षण | 67 | 32 | 14 | 10 | 15 | 10 | 10 | 107 | **265** | 151 | 416 |
| माजी सैनिक 15% | 33 | 16 | 7 | 5 | 8 | 5 | 5 | 53 | **132** | 76 | 208 |
| भूकंपग्रस्त 2% | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 | **18** | 10 | 28 |
| प्रकल्पग्रस्त 5% (केवळ मनपा प्रकल्पांसाठी) | 11 | 5 | 2 | 2 | 3 | 2 | 2 | 18 | **44** | 25 | 69 |
| खेळाडू 5% | 11 | 5 | 2 | 2 | 3 | 1 | 2 | 18 | **44** | 25 | 69 |
| बृहन्मुंबई मनपा मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या व NCTVT परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार 10% | 22 | 11 | 5 | 3 | 5 | 3 | 3 | 36 | **88** | 51 | 139 |
| **एकूण** | **223** | **108** | **48** | **34** | **51** | **32** | **32** | **356** | **884** | **504** | **1388** |

दिव्यांग (अपंग) उमेदवारांची रिक्त पदे भरण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली होती. त्यामुळे दिव्यांग (अपंग) उमेदवारांचा अनुशेष नाही.

२. टिप

- भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक/समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया अंशतः/पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- सर्व समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे प्रक्रिया राबविली जाईल.
- शासन निदेशानुसार स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना शासनाच्या अर्हता व सवलती विचारात घेऊन महापालिका सेवेत समाविष्ट करुन घेण्यात येईल.

**३. उपरोक्त पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणीः**

शैक्षणीक अर्हताः किमान इयत्ता १०वी परीक्षा १०० गुणांच्या मराठी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या अर्हता स्वीकारार्ह असतील.

वेतनश्रेणीः PB1- रु. ५२००-२०२०० + ग्रेड पे रु. १८००/-

**४. <u>वयोमर्यादा, वजन व उंची</u> :**

**उमेदवाराचे वय** दिनांक ३०.११.२०१७ रोजी

1) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत - १८ ते ३८ वर्ष
2) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत - १८ ते ४३ वर्षे
3) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील. तसेच माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.
4) तसेच शासन निर्णय क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.०६ ऑक्टोबर २०१० नुसार (अ) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, या घटकातील उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केलेली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील.
5) शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता कामगार/कक्षपरिचर/श्रमीक/हमाल/बहुउद्देशीय कामगार/स्मशान कामगार/आया इ. पदासाठी असलेली वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहिल.
6) केवळ बृहन्मुंबई महागनरपालिकेमधून प्रशिक्षण घेऊन NCTVT उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

**वजन व उंची**

अ) पुरुष उमेदवारः किमान वजन ५० कि.ग्रॅ. व उंची १५७ सें.मी.

ब) स्त्री उमेदवारः किमान वजन ४५ कि.ग्रॅ. व उंची १५० सें.मी.

**५. <u>निवडीचे निकष व कार्यपध्दती</u>**

1) प्राप्त झालेल्या अर्जांमधून उमेदवारांची 'Online' लेखी परीक्षा घेण्यात येईल. 'Online' परिक्षेत मिळालेल्या उच्चतम गुणांनुसार आणि सामाजिक व समाईक आरक्षणानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.
2) पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाईक एकत्रीत गुणवत्तायादी तयार करुन सदर गुणवत्ता यादीमधील उच्च

गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी विचार करण्यात येईल.

3) दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांचे समान गुण झाल्यास उमेदवाराच्या जन्मदिनांकानुसार वयोज्येष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल.

4) उपरोक्त निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहतील.

5) प्रत्येक उमेदवाराची Online परीक्षा ही १०० प्रश्नांची असेल. प्रत्येक प्रश्नाच्या बरोबर उत्तरास १ गुण देण्यात येईल. चुकीच्या उत्तरास ० (शुन्य) गुण देण्यात येईल. Online परिक्षेचा कालावधी २ तासांचा असेल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने Online परिक्षेत १०० पैकी किमान ५० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
परिक्षेसाठी अभ्यासक्रम खालीलप्रमाणे:
मराठी: ४० गुण
इंग्रजी: १० गुण
सामान्य ज्ञान: २५ गुण
अंकगणित व तर्कज्ञान: २५ गुण

6) समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदांकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षणविरहित म्हणून भरली जातील. तसेच निवड झालेले उमेदवार काही कारणास्तव अपात्र ठरणे/संपर्क न साधणे इ. कारणास्तव रिक्त ठरलेली पदे पुढील गुणवत्ता यादीनुसार भरण्यात येतील.

**६. <u>ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:</u>**

**नोंदणी:**

i. ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज http://portal.mcgm.gov.in या किंवा **https://mcgmlabourrecruitment.mahaonline.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ii. उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळाला भेट देऊन 'Labour Recruitment 2017' या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम आवश्यक माहिती, ४.५ सें.मी. x ३.५ सें.मी. साईझचा फोटो व सही स्कॅन करुन (20 ते 50 KB पर्यंत) अपलोड करणे, Online Payment करणे इ. बाबींची पूर्तता केल्यानंतर उमेदवारास अर्ज क्रमांक मिळेल.

iii. उमेदवाराने अर्ज संपूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी.

iv. Online लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र याबाबतच्या सर्व सूचना, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

v. पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये. तसेच यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरीकरिता प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

vi. उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन (On-line) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

vii. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही, याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेले भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

**७. <u>भरती प्रक्रिया शुल्क:-</u>** 1) खुल्या प्रवर्गाकरिता रू. ८००/- (रुपये आठशे फक्त)

2) मागासवर्गीय प्रवर्गाकरिता रू. ४००/- (रुपये चारशे फक्त)

3) माजी सैनिकांनी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

भरती प्रक्रिया शुल्क जाहिरातीत नमूद केलेल्या पध्दतीनुसार परिक्षा शुल्क Net banking पध्दतीने, क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड वापरून भरू शकतील. सदर आवेदन शुल्क हे ना-परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**८. <u>सर्वसाधारण अटी</u> :-**

1. निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.
3. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
4. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.
5. उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागद पत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

   **अ.** उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र, जाती वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या मूळप्रती व सांक्षांकित छायांकित प्रती.

   **ब.** विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

   **क.** अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र.

   **ड.** महिला आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या अजा/अज प्रवर्ग वगळता खुल्या वर्गासहीत इतर सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

   खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायाप्रती नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

   **इ.** उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आणणे आवश्यक आहे.

   **ई.** फोटो असलेले ओळखपत्र उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड इ. सोबत आणणे आवश्यक आहे.
6. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.
7. निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारास 'ड' संवर्गातील पदावरील नियुक्तीनंतर, महापालिकेच्या आवश्यकतेनुसार, तिन्ही पाळीमध्ये (Shift

Duty) कामकाज करावे लागेल.

8. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील.

9. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

10. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

11. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

12. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/प्रक्र १०६४/२०११/१६ ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

13. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

14. उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

15. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

16. प्रकल्पग्रस्तांसाठी सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र. १० दि. ०३.०४.०८ अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महागनरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा उमेदवारांमधून प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

17. शासन अधिसूचना दि.२८.३.२००५ व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.०१.७.२००५ लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

18. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार माननीय महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

19. निवडयादी एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यत विधिग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

20. शासन निर्णय क्र.राक्रीधो -२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे/२ दि. ३०.४.२००५ व तद्नंतर सुधारीत निर्णयानुसार गट 'ड' साठी क्रिडाविषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले असावे. ते प्रमाणपत्र विधिग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. शासनमान्य क्रीडाप्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

21. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व

निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

22. काही अपरिहार्य कारणास्तव 'Online' परिक्षेच्या तारखेमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

23. उमेदवाराने या भरतीप्रक्रिया संदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया वरील संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे.

24. भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी आवश्यकतेनुसार कुठलीही चाळणी पध्दती वापरण्याचा हक्क प्रशासन राखून ठेवीत आहे. तसेच सदर भरती रद्द करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

25. उमेदवार उच्च शिक्षित असला तरीदेखील त्याला जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर काम करणे बंधनकारक राहील तसेच उमेदवाराची कामगार प्रवर्ग सोडून किंवा इतर कोणत्याही खात्यातील पदावर काम करण्याची विनंती भविष्यातदेखील मान्य करता येणार नाही.

26. निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**<u>समांतर आरक्षण</u>**

अ) शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी ३०% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) उपरोक्त रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्र.राक्रीधो - २००२/प्रक्र ६८/क्रीयुसे/२ दि. ३०.४.२०१५ अन्वये शासनमान्य क्रीडाप्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

क) प्रकल्पग्रस्तांसाठी सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्रमांक 10 दि.०३.४.२००८ अन्वये मंजुर झालेले मार्गदर्शन तत्वे यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल प्रकल्पात संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित पदे भरण्यात येतील.

ड) माजी सैनिक व भुंकपग्रस्त यांची शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सदर पदे भरण्यात येतील.

**९. <u>विशेष सूचना</u> :**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार On-line पध्दतीने अर्ज सादर करावा.
3. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
4. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.
5. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१०. Online परिक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे:**

| | | |
|---|---|---|
| ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | : | दिनांक ११.१२.२०१७ |
| ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | : | दिनांक ३१.१२.२०१७ (२३.५९ वाजेपर्यंत) |
| संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | : | दिनांक ११.१२.२०१७ ते दिनांक ०१.०१.२०१८ |
| ऑनलाईन परिक्षेसाठी प्रवेशपत्र मिळण्याचा दिनांक | : | दिनांक १५.०१.२०१८ पासून |
| ऑनलाईन परीक्षा | : | फेब्रुवारी महिन्याचा दुसरा व तिसरा आठवडा |
| उमेदवारास ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या गुणांबाबतची माहिती | : | फेब्रुवारी महिन्याचा चौथा आठवडा |
| आक्षेप व्यवस्थापन (उमेदवारास मिळालेल्या गुणांबाबत) | : | उमेदवारांकडून आक्षेप/शंका मागविणे:<br>दिनांक ०१.३.२०१८ ते ०५.३.२०१८<br>आक्षेप/शंकांचे निरसन:<br>दिनांक ०६.३.२०१८ ते २५.३.२०१८ |
| अंतिम निवड यादी | : | एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा |

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| प्रमुख कामगार अधिकारी (प्र.) | उप-आयुक्त (सा.प्र.) | अति. आयुक्त (शहर) | म.न.पा. आयुक्त |